# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# येशू बारा मदतनिसांची निवड करता

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus
रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2015 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

येशूने अद्भुत गोष्टी केल्या. त्याने आजार बरे केले, अस्वस्थ असलेल्या लोकांच्या ह्दयात व मनात त्याने शांती दिली, आणि देवाचे वचन शिकविले.



मदतीसाठी आणि रोग बरे व्हावेत म्हणून लोकसमुदाय येशूकडे येत. त्याला देवाचे काम करण्यास मदत करावी यासाठी त्याचे जे पुष्कळ अनुयायी होते त्यांच्यातून बारा जणांची निवड करण्याचे त्याने ठरविले.





जेंव्हा तुम्हांला एखादा महत्वाचा निर्णय घ्यायचा आहे, तेंव्हा तुम्ही देवाकडे प्रार्थना करता का? येशूने केली! डोंगरावरील शांत ठिकाणी तो त्याच्या स्वर्गिय पित्याशी बोलला. सूर्य मावळेपर्यंत येशूने प्रार्थना केली.



त्या अंधाऱ्या रात्री येशू
संपूर्ण रात्रभर प्रार्थना
करीत होता.

सकाळी, येशूने त्याच्या सर्व अनुयायांना – जे त्याची सेवा करित व त्याच्या आज्ञा पाळीत अशा मित्रांना बोलाविले. त्यांच्यातून त्याने बारा जणांना त्याचे विशेष मदतनिस किंवा प्रेषित बनण्यास निवडून घेतले.



सर्वात आधि ज्यांची निवड केली ते दोघे, शिमोन पेत्र व अद्रिया हे भाऊ होते. जेंव्हा येशूने त्यांना त्याच्या मागे येण्याचे आव्हान केले तेंव्हा त्यांचा मासेमारीचा व्यवसाय सोडून ते येशूच्या मागे गेले.



जब्दीचे मुलगे याकोब आणि योहान हे देखिल मासेमारीचे जाळे सोडून येशूच्या मागे गेले.



फिलिप्प, बर्थलमय, मत्तय, थोमा, शिमोन जिलोत, अल्फिचा मुलगा याकोब आणि या याकोबाचा भाऊ तद्दय, आणि यहुदा इस्कर्योत ज्याने नंतर येशूला धरुन दिले.



येशू जे काही सांगतो त्याप्रमाणे वागणे म्हणजे मजबूत खडकावर घर बांधण्यासारखे आहे, असे येशूने शिकविले. उंचबळून आलेले वादळ त्या घराचा नाश करु शकणार नाही.



परंतू येशूच्या सांगण्याप्रमाणे न वागणे हे वाळूवर बांधलेल्या एखाद्या घरासारखे आहे. आणि जेंव्हा वादळ वारा येईल तेंव्हा ते घर पूर्ण पडून जाईल.



येशूच्या काही आज्ञा सोप्या नव्हत्या. "जर कोणी तुझ्या उजव्या गालावर मारील तर तु त्याच्यासमोर तुझा डाव गाल देखिल दे" "तुमच्या शत्रूंवर प्रीति करा" अशी येशूची शिकवण होती. येशूच्या शिकवणीप्रमाणे जगण्यासाठी लोकांना देवाची मदत हवी.



ज्याप्रकारे काही धर्मपुढारी, लोकांना दाखविण्यासाठी करतात तसे नव्हे तर येशूने लोकांना गुप्तपणे प्रार्थना करण्यास देखिल शिकविले.



येशूने म्हटले की, जे कोणी देवावर भरोसा करतात त्यांना तो अन्न व वस्त्र यांचा पुरवठा करतो. जर तो पक्षांना अन्न देतो आणि रानातील गवताला व फुलांना सुंदर रंग देतो, तसे त्याचे लोक त्यांच्या सर्व गरजांसाठी त्याच्यावर विसंबून राहू शकतात.



त्या दिवशी येशूने त्याच्या नविन निवडलेल्या मदतनिसांना पुष्कळ गोष्टी शिकविल्या. जेंव्हा त्याने शिकवणे संपवले तेंव्हा येशूकडे आरोग्याची भिक मागत तेथे एक महारोगी आला.





येशूने त्या महारोगी मनुष्याला म्हटले, "माझी इच्छा आहे. शुध्द् हो." त्याचे मदतनिस पाहात असता तो महारोगी मनुष्य पुर्ण बरा झाला. तो आजारातून पूर्ण बरा झाला! हे केवळ देवाचा पुत्रच करु शकत होता. आमचा प्रभू; मालक अद्‌भुत आहे हे त्या मदतनिसांना माहित होते.

# येशू बारा मदतनिसांची निवड करता

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मत्तय ४-७, मार्क १, लूक ६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16